**प्रेसनोट दि.२३/०८/२०१९**
**चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन,पुणे**

**चतु:श्रृंगी पो.स्टे.चे डीबी पथकाने घरफोडी करणा-या महिलेस केले अटक**

दिनांक २१/०८/२०१९ रोजी पोलीस उप निरीक्षक श्री फड,पोलीस हवा.५३७५ खळदकर, पो.हवा.२२२१ तारू,पो.ना.६९३८ साळवी, पो.ना.२०५३ आव्हाड,पो.शि.७७१६ मुळे,पोलीस शिपाई ७५७२ शेख,पोलीस शिपाई ९९१० राठोड, व पो.शि.८४३७ चोपडे असे चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन हद्दीत गुन्हे प्रतिबंधात्क पेट्रोलिंगकामी चतु:श्रृंगी पोलीस स्टेशनचे हद्दीत १५.०० वा.रवाना होवून चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन हद्दीत गुन्हे प्रतिबंधात्मक पेट्रोलिंग करीत आम्ही धनकुडे वस्ती बाणेर रोड पुणे येथे १५.४५ वा.आलो असताना पोलीस हवा.५३५७ खळदकर व पोलीस शिपाई ८४३७ चोपडे यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की,रेकॉर्डवरील महिला नामे उषा रामा कांबळे व तिचा साथीदार रामा बापा जाधव असे दोघांनी साईपॅलेस प्रभातनगर रोड बाणेर पुणे येथे घरफोडी चोरी केली असून ते सध्या पॅनकार्ड क्लब रोड बाणेर पुणे येथे आलेले आहेत.अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने वरील स्टाफसह व सोबत महिला पोलीस शिपाई ८०६५ आनंदकर यांना सोबत घेवून खाजगी वाहनाने पॅनकार्ड क्लब रोड बाणेर पुणे येथे जावून खात्री करता पॅनकार्ड क्लबरोड वर आम्ही ओळखत असलेल्या वरील महिलेस पोलीस शिपाई आनंदकर यांचे मदतीने व तिचे सोबतचे इसमास १६.१५ वा.ताब्यात घेवून चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन येथे आणून त्यांचेकडे घरफोडी गुन्हयाबाबत तपास करता त्यांनी साई पॅलेस प्रभातनगर रोड बाणेर पुणे येथे घरफोडी केल्याचे सांगितलेने सदरबाबत चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन गुन्हा रजि.७२७/२०१९ भादवि कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे गुन्हा दाखल करुन दिनांक २१/०८/२०१९ रोजी १७.०० वा.अटक करण्यात आली असून त्यांचेकडून वरील गुन्हा उघडकीस आणून उत्तम कामगिरी केली आहे.